# परिपत्रक

क्र.प्रअचौ/मुख्यालय/ससा/4372 दि.22.09.2015

विषय:- प्रमुख अधिकारी (चौकशी) खात्यात अन्वेषण अधिकारी (चौकशी) या संवर्गातील रिक्त पदे नियमित तत्त्वावर भरण्याबाबत व प्रतिक्षा यादी तयार करण्याबाबत.

-----

प्रमुख अधिकारी (चौकशी) खात्याच्या आस्थापनेवरील रु.9300-34800 + ग्रेड पे रु.4300 + विशेष वेतन + वाहन भत्ता + अनुज्ञेय भत्ते या वेतनश्रेणीत अन्वेषण अधिकारी (चौकशी) संवर्गातील एकूण रिक्त 28 (रिक्त 27+1 संभाव्य रिक्त) व अतिरिक्त संभाव्य पदे भरण्याकरिता/प्रतिक्षा यादी तयार करण्यासाठी खालील अर्हता धारण करणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांकडून सोबतच्या नमुन्यामध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

1) उमेदवार कला, विज्ञान, विधी किंवा वाणिज्य शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा.

2) मुख्य लिपिक आणि वरिष्ठ लेखा परीक्षा व लेखा सहाय्यक व तत्सम या पदासाठी विहित केलेली खात्यांतर्गत परीक्षा उत्तीर्ण असावा व सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्या पदावरील कमीत कमी 3 वर्षे प्रत्यक्ष कामाचा अनुभव असला पाहिजे.

3) दि.31.08.2015 रोजी उमेदवाराचे वय 45 वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासर्गीयांच्या बाबतीत 50 वर्षे).

4) मराठी भाषा परिपत्रक क्र.एमपीएम/5061 दि.27.02.2003 नुसार उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

5) संगणक परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/6381 दि.19.11.2005 नुसार उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे 'सीसीसी' किंवा ओ स्तर किंवा ए स्तर किंवा बी स्तर किंवा सी स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एमएससीआयटी', किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

<u>**टिप**</u> - कर्मचाऱ्यांच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालांमधील प्रतवारी कमीतकमी तीन वर्षाच्या गोपनीय अहवालांची प्रतवारी 'अ'असावी व दोन वर्षाच्या गोपनीय अहवालांची प्रतवारी कमीतकमी 'ब' असावी.

लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची अंतिम निवडयादी तयार करतांना विधी शाखेच्या मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी व पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना अतिरिक्त प्रत्येकी 5 गुण दिले जातील.